**प्रेसनोट दि. ०३/०६/२०१९**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**दौंड पो.स्टे. मनुष्य मिसिंग मधील इसमाचा सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीत शोध**

दि. ०१/०६/२०१९ रोजी पोलीस उप-निरीक्षक एस.एस.घाडगे यांना सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीमध्ये रात्रगस्त कर्तव्य असताना सनसिटी भागामध्ये एक इसम विनाकारण फिरत असताना आढळुन आला असता त्यांनी सदर इसमाजवळ जावुन त्याचे नाव व पत्ता विचारता त्याने त्याचे नाव विशाल युवराज जगताप, वय २५ वर्षे, रा. कुरकुम, ता. दौंड, जि. पुणे असे सांगीतले. सदर इसमाकडे अधिक चौकशी केली असता सदरचा इसम हा माणसीक तणावामध्ये असल्याचे लक्षात आल्याने पोलीस उप-निरीक्षक एस.एस.घाडगे यांनी त्यास सिंहगडरोड पो.स्टे. येथे आणुन त्याचेबाबत दौंड पो.स्टे. पुणे ग्रामीण या ठिकाणी संपर्क केला असता सदर इसमाबाबत त्याचे वडील नामे युवराज सखाराम जगताप, रा. कुरकुम, ता. दौंड, जि. पुणे यांनी दि. २१/०५/२०१९ रोजी मनुष्य मिसिंग तक्रार दिल्याने दौंड पो.स्टे. मनुष्य मिसिंग रजि.नं. ४०/२०१९ अन्वये मिसींग तक्रार दाखल असुन सदर मनुष्य मिसिंगचा शोध पोलीस नाईक २१२४ आर.एच.फाळके, नेमणुक दौंड पो.स्टे. पुणे ग्रामीण हे करीत असलेबाबत माहिती पोउपनिरी घाडगे यांना मिळाली. त्यांनी सदर मनुष्य मिसिंग नं. ४०/२०१९ मधील इसम नामे विशाल युवराज जगताप, वय २५ वर्षे, रा. कुरकुम, ता. दौंड, जि. पुणे हा सिंहगडरोड पो.स्टे. हद्दीत मिळुन आलेबाबत पोना फाळके, दौंड पो.स्टे. यांना माहिती देवुन सदर इसमाचे वडील नामे युवराज सखाराम जगताप, रा. कुरकुम, ता. दौंड, जि. पुणे यांना संपर्क करुन त्यांना सिंहगडरोड पो.स्टे. या ठिकाणी बोलावुन घेवुन त्यांचा मुलगा नामे विशाल युवराज जगताप, वय २५ वर्षे, रा. कुरकुम, ता. दौंड, जि. पुणे यास त्यांचे ताब्यात देवुन सपोनि एस.आर.शिंदे व पोउपनिरी एस.एस.घाडगे यांनी उत्कृष्ट कामगीरी केली आहे. सदर इसम नामे विशाल युवराज जगताप यास त्याचे वडीलांचे ताब्यात सुखरुप दिल्याने त्याचे वडील व नातेवाईकांनी पोलीसांचे आभार मानले आहेत.

